**महाराष्ट्र शासन**

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

क्रमांक- मग्रारोहयो-1/ओम्बडसमन/2023

कार्यालयीन पत्ता - जिल्हाधिकारी कार्यालय, जयस्तंभ, रत्नागिरी

दिनांक - 15/08/2023

**तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson)**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना सर्व साधारण जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारींचा निपटारा करणे व योजनेच्या कामात पारदर्शकता राखण्याकरीता उपाययोजना सुचविणे यासाठी रत्नागिरी जिल्हयाकरीता तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson) यांची नेमणूक करणेसाठी दिनांक 08/08/2023 रोजी जाहिरात देणेत आली होती. तरी सदर जाहिरातीमध्ये अंशत: बदल असल्याने खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक काढण्यात येत आहे.

**शुध्दीपत्रक**

**किमान पात्रता :-**

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवारास लोकप्रशासन/विधी/सामाजिक कार्य/शैक्षणिक किंवा व्यवस्थापन क्षेत्रातील किमान दहा वर्षाचा अनुभव असावा. उमेदवार संबंधित जिल्हयातील रहिवासी असावा.

इच्छुक उमेदवारांनी स्वत:ची शैक्षणिक पात्रता,अनुभव, वय इ.चे दाखले त्याचप्रमाणे fitness बाबत वैद्यकिय दाखला, राजकीय पक्षाचा सदस्य नसल्याचे व कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे नोटरी केलले प्रतिज्ञापत्र इ.सह जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्या नावाने अर्ज तयार करावा व सदर अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो), रत्नागिरी यांचे कार्यालयात **दिनांक 21 ऑगस्ट, 2023 सायं. 6.00 वाजे पर्यंत** सादर करावा. उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

या प्रक्रियेकरीता प्राप्त होणा-या अर्जांपैकी कोणतेही कारण न देता विशिष्ट अर्ज किंवा सर्व अर्ज रदद करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

सदर पदासाठी इतर किमान पात्रता व कालवधी, मानधन याचा तपशिल व जाहिरातीत नमूद इतर बाबी दिनांक 08/08/2023 च्या जाहिरातनुसार कायम रहातील.

**(एम. देवेंदर सिंह)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक**
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना रत्नागिरी**